# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

डॉ. जे.व्ही .दडवे
संचालक (प्रभारी.)
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२१६५५४, २२३१०४ फॅक्स : ०७१३२.२२२६५१
Email : bcud.gondwanaunivesity@ gmail.com
web:gondwana.digitaluniversity.ac web:www.unigug.org

*क्रमांक/गो.वि./ 779 /२०१६* — *दिनांक :७ /१२ /२०१६*

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:— राज्यातील शहीद जवानांच्या व पोलीसांच्या विधवांना/पाल्यांना मोफत शिक्षण देण्याबाबात**

**संदर्भ:— अंबादास ऐ.मोहिते संस्थापक अध्यक्ष, मास्वे. यांचे दि.१९/११/२०१६ चे पत्र.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये कळविण्यात येते की,''राज्यातील शहिद लष्करी व पोलीस जवानांच्या विधवांना व पाल्यांना मोफत शिक्षण उपलब्ध करुन देण्याची योजना'' महाविद्यालय स्तरावर सुरु करण्याचे अनुषंगाने संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन कार्यवाही घ्यावी व केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल विद्यापीठास सादर करावा ही विनंती.

सधन्यवाद.

**सहपत्र:—** सदर्भीय पत्र

संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)

D/abcd/p

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 3830 दिनांक 2/12/16
जावक क्र. ........... दिनांक

# MAHARASHTRA ASSOCIATION OF SOCIAL WORK EDUCATORS

**(MASWE)**

**Prof.Ambadas Y. Mohite**
Founder President

**Sai Sukh, Apratim Colony, Jail road, Camp, Amravati. Mob. : 9422190871**

दिनांक : १९/११/२०१६.

प्रति,

मा. डॉ. एन. व्ही. कल्याणकर,
कुलगुरु,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 991 दि. 01/12/16
जावक क्र. 1265 दि. 01/12/16

गोंडवाना विद्यापीठ, गडचि...
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 1618 दि. 01/12
जावक क्र. 8210 दि. 2/12/

**विषय :- राज्यातील शहीद जवानांच्या व पोलीसांच्या विधवांना / पाल्यांना मोफत शिक्षण देण्याबाबत.**

**मा. महोदय,**

देशाच्या सीमेवर अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत लष्कराच्या तीन ही दलाचे जवान देशाच्या संरक्षणाचे कर्तव्य जीवाची पर्वा न करता करीत असतात. परकिय शत्रु, आतंकवादी, दहशतवादी यांचेशी लढा देणाऱ्या तसेच नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या वेळेस लोकांचे जीव वाचविणाऱ्या व त्यांच्या मालमत्तेची सुरक्षा करणाऱ्या जांबाज जवान व पोलीसांमुळेच आपण सुरक्षीत जीवन जगु शकतो ही वास्तविक्ता आहे. ही बाब विचारात घेता, देशाच्या व समाजाच्या संरक्षणार्थ आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या राज्यातील लष्करी, निमलष्करी तसेच पोलीस अधिकारी व जवानांच्या विधवा वा पाल्यांना जर आपल्या विद्यापीठात शिक्षण घ्यायचे असेल तर विद्यापीठाने त्यांना मोफत शिक्षण उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

विद्यापीठाने शहीद जवानांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता तसेच देश व समाजाच्या रक्षणाकरीता आपल्या जीवाची बाजी लावणाऱ्या लष्करी व पोलीस जवानांना विद्यापीठ तुमच्या व तुमच्या कुटुंबियांसोबत आहे हा विश्वास देण्याकरीता **"राज्यातील शहीद लष्करी व पोलीस जवानांच्या विधवांना व पाल्यांना मोफत शिक्षण उपलब्ध करुन देण्याची योजना"** सुरू करावी व सामाजिक बांधिलकी जपावी ही विनंती. आपल्या नेतृत्वात विद्यापीठ हा पुरोगामी निर्णय घेईल असा विश्वास आहे. **धन्यवाद!**

सकारात्मक प्रतिसादाच्या अपेक्षेत.

आपला विश्वासु,

(Signature)

**(प्रा. अंबादास ये. मोहिते)**
संस्थापक अध्यक्ष, मास्वे.